**जी. एच. रायसोनी फाँउंडेशन सोसायटी, नागपूर संचालित जि.एच रायसोनी पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, लेक विव्ह, अंबाझरी, हिंगणा रोड, नागपूर या शाळेचे मौजा रियान टॉवर, रंगीलाल मार्ग, मंगलवारी बाजार रोड, सदर, नागपूर येथे स्थलांतर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३१२६/प्र.क्र.५२९/एसएम-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १६ जून , २०२६

**वाचा :**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : माशास्थ ३३२१/प्र.क्र.४०१/एसएम-१ दिनांक १५ मे, २०२६

**संदर्भ :**

विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.शिउसं/माध्य-अ/शाळा स्थांनतरण /२१०९१००/२०२५, दि.१३/०१/२०२६

**प्रस्तावना :-**

जी.एच. रायसोनी फाँउंडेशन सोसायटी, नागपूर संचालित जि.एच रायसोनी पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, लेक विव्ह, अंबाझरी, हिंगणा रोड, नागपूर या स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी उच्च माध्यमाच्या शाळेचे (इ.१ ली ते १२ वी,वाणिज्य व विज्ञान शाखेसह ) मौजा रियान टॉवर, रंगीलाल मार्ग, मंगलवारी बाजार रोड, सदर, नागपूर येथे स्थलांतरास मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त शाळेमध्ये अपुऱ्या पडणाऱ्या भौतिक सुविधेमुळे स्वयंपूर्ण इमारतीत स्थलांतर प्रस्तावित केले आहे. त्यामुळे सदर शाळेचे उपरोक्त ठिकाणी स्थलांतर करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही. तसेच सर्व विद्यार्थ्यांना स्थलांतराच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहील.

(२) सदर शाळा इंग्रजी माध्यमाची स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील असल्याने शाळेत कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(३) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(४) शाळेच्या बाबतीत मूळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.

(५) सदर स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सदर शाळेच्या स्थलांतराबाबत पुढील कार्यवाही १५ दिवसांत करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६१६१३००२२४१२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHARAD SHRIPATRAO MAKNE

Digitally signed by SHARAD SHRIPATRAO MAKNE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=40009B0C8C256BDD08326D4D03BC30FB4DE2ADCC1F32BBB9E402266A2B8F7A5A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1B4D811632BD3D04BCA0618EEF09D95DD93FF5D37934DF32703629ABD10E555A, cn=SHARAD SHRIPATRAO MAKNE
Date: 2026.06.16 13:01:18 +05'30'

**(शरद माकणे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर
४. अध्यक्ष/ सचिव, जी.एच. रायसोनी फाँउंडेशन सोसायटी, नागपूर
५. निवडनस्ती (एसएम-१).